# जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव

## सरळसेवा भरती प्रक्रिया-२०१६

## वाहनचालक पदासाठी चाळणी (लेखी) परीक्षेबाबत विशेष सूचना

जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव मार्फत जिल्हाधिकारी जळगाव यांचे आस्थापनेवरील लिपीक-टंकलेखक, वाहनचालक तसेच, जिल्हाधिकारी जळगाव यांचे अधिनस्त उपविभागीय अधिकारी यांचे आस्थापनेवरील तलाठी (पेसा क्षेत्रातील), तलाठी (पेसा क्षेत्राबाहेरील) आणि नोंदणी व मुद्रांक विभागाकडील सह जिल्हा निबंधक वर्ग-१, जळगाव यांचे आस्थापनेवरील कनिष्ठ-लिपीक संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरणेकामी जाहिरात क्र. आस्थाप/मावक/२०१६/१/९/५, दि. ०१/०८/२०१६ अन्वये संक्षिप्त जाहिरात वृत्तपत्रांमध्ये आणि सविस्तर जाहिरात या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर सविस्तर जाहीरातीमधील पानांक ०९ वर **वाहनचालक पदाची चाळणी परीक्षा घेण्याचा निर्णय जिल्हा निवड समितीमार्फत घेण्यात येईल** असे नमूद करण्यात आलेले आहे. सबब वाहनचालक पदासाठी प्राप्त झालेल्या अर्जांच्या संख्येचा विचार करता, सदर वाहनचालक पदासाठी चाळणी परीक्षा घेण्याचा निर्णय जिल्हा निवड समितीमार्फत घेण्यात आलेला आहे.

**सदर वाहनचालक पदासाठी लेखी परीक्षेचा दिनांक व वेळ पुढीलप्रमाणे राहील.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **लेखी परीक्षेचा दिनांक** | :- | दि. ०४/०९/२०१६. |
| २ | **परीक्षेची वेळ** | :- | सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० |
| ३ | **लेखी परीक्षेचा स्तर / दर्जा** | :- | वाहनचालक पदाकरीता विहीत करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेवर आधारीत तसेच, संबंधित पदासाठी आवश्यक असलेल्या कौशल्य तपासणीस पुरक राहील. |
| ४ | **चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम** | :- | वाहनचालक पदासाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हतेवर आधारीत राहील. |
| ५ | **लेखी परीक्षेच्या प्रश्नांचे स्वरुप** | :- | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाचे राहील. |
| ६ | **प्रश्नांची संख्या** | :- | एकूण ५० प्रश्न. |
| ७ | **एकूण गुण** | :- | प्रत्येक प्रश्नास ०२ गुण याप्रमाणे एकूण १०० गुण. |

**ठिकाण** :- जळगाव.
**दिनांक** :- २३/०८/२०१६.

**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती**
**तथा जिल्हाधिकारी जळगाव**